ePaper **पुण्यातील नवले पुलाजवळ धावत्या ट्रकला भीषण आग, चौघांचा मृत्यू**



वर्ष - 7 । अंक - 161 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- ऑस्ट्रेलियाने उघडले विजयाचे खाते!
- राहुल गांधींची मिझोराममध्ये पदयात्रा!
- कुठला लांडगा भांडण लावतो?
- शासकीय जागेवर बिल्डरची नजर!


www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 17 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# वीज दरवाढीचा झटका!

## » महावितरणचा निर्णय : सप्टेंबरच्या बिलसाठी दरवाढ लागू

### » आमदार महेश लांडगे यांचा मागणीला यश

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी- चिंचवडमध्ये महापालिका प्रशासनाकडून सुरू असलेली उपयोगकर्ता शुल्काची दंड वसुलीला अखेर स्थगिती मिळाली आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीमध्ये याबाबत सविस्तर बैठक घेण्यात येईल आणि तोपर्यंत ही वसुली थांबवावी, असा मोठा निर्णय कॅबिनेट मंत्री डॉ. उदय सामंत यांनी घेतला. त्यामुळे सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांना दिलासा मिळाला आहे.**



ऐन सणासुदीच्या काळात जनतेला वीजदरवाढीचा झटका सहन करावा लागणार आहे. वीज खरेदी खर्चात वाढ झाल्याने महावितरणकडून वीजबिलांत इंधन समायोजन आकार वसूल केला जाणार असून, परिणामी घरगुती वीज ग्राहकांना सप्टेंबरच्या बिलासाठी प्रति युनिट ३५ पैसे जादा द्यावे लागणार आहेत.

यासंदर्भात महावितरणच्या मुख्य अभियंतांनी (वीज खरेदी) आदेश काढले आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे महावितरणकडून सप्टेंबरच्या वीजबिलात इंधन समायोजन आकार वसूल केला जाणार आहे, असे या आदेशात म्हटले आहे. ही वसुली येत्या काही महिन्यांत सुरू राहणार आहे. त्यामुळे दारिद्र्यरेषेखालील, तसेच पाचशे युनिटपेक्षा अधिक वीज वापरकर्त्यांवरही परिणाम होणार आहे. यासोबतच कृषी वीजजोडणी असलेल्या ग्राहकांना प्रति युनिट दहा व पंधरा पैसे, तर औद्योगिक ग्राहकांना प्रति युनिट २० पैसे जादा द्यावे लागणार आहेत. महावितरणला मार्च, एप्रिल व मे महिन्यांत अल्पकालीन करार व पॉवर एक्स्चेंजद्वारे अतिरिक्त वीज खरेदी करावी लागली होती. त्याची भरपाई म्हणून सप्टेंबर महिन्याच्या वीजबिलात इंधन समायोजन आकार वसूल केला जात आहे, असे महावितरणमधील सूत्रांनी सांगितले.

### मार्च 2020मध्ये इंधन समायोजन आकार होता शून्य

»महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने मार्च २०२०मध्ये इंधन समायोजन आकार शून्य केला होता. त्याची फेब्रुवारी २०२०पर्यंत अंमलबजावणी झाली. त्यानंतर गेल्या वर्षी मार्च, एप्रिल, मे महिन्यांत हा आकार सरासरी १५ ते २० पैसे प्रति युनिट होता. दरम्यान, देशात कोळशाचा तुटवडा निर्माण झाल्याने वीज उत्पादनावर मोठा परिणाम झाला होता. परिणामी वीज वितरण कंपन्यांना खुल्या बाजारातून महागड्या दराने वीजखरेदी करावी लागली होती. त्यामुळे पुन्हा गत वर्षी जून ते ऑक्टोबर या पाच महिन्यांच्या बिलात प्रति युनिटमागे कमीत कमी २५ पैशांपासून जास्तीत जास्त अडीच रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली होती. आता पुन्हा सप्टेंबरच्या वीजबिलात हा आकार लावल्याने वीज ग्राहकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

### इंधन समायोजन आकारात वाढ (प्रति युनिट)

| | |
|---|---|
| »० ते १०० युनिट | ५ पैसे |
| १०१ ते ३०० युनिट | २५ पैसे |
| ३०१ ते ५०० युनिट | ३५ पैसे |
| ५०१ युनिटपासून पुढे | ३५ पैसे |



# नदी संवर्धनासाठी सुरक्षा दल!

## » प्रशासनाची तयारी : आयुक्त शेखर सिंह यांची माहिती

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील नद्यांचे संवर्धन करण्यासाठी नदी सुरक्षा दलाची नेमणूक करण्यात येणार असून त्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मदत घेण्यात येणार आहे. नदीकाठच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत.तसेच नद्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा बांधकाम राडारोडा, कचरा टाकणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.**

नदी संवर्धनासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येणार असून त्यासाठी विविध सामाजिक संस्था आणि शैक्षणिक संस्थाचीही मदत घेण्यात येईल, असे आयुक्त शेखर सिंह म्हणाले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृह येथे नदी संवर्धन या विषयासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी आयुक्त सिंह बोलत होते.

या बैठकीला अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, कार्यकारी अभियंता हरविंदरसिंग बंसल, अनिल राऊत, उप अभियंता योगेश अल्हाट तसेच सिटिझन फोरमचे तुषार शिंदे, इन्होवेशन ऍन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशनचे संजय लकडे, जलदिंडीचे राजीव भावसार, सुर्यकांत मुथियान तसेच विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांचे शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. या बैठकीच्या वेळी सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी, शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी नदी संवर्धनासाठीच्या आपल्या प्रतिक्रिया आयुक्तांसमोर मांडल्या.



### नागरिकांमध्ये जनजागृतीचा प्रयत्न...


»आयुक्त सिंह यावेळी म्हणाले, नदी संवर्धनासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. ड्रेनेज किंवा नाल्यांमधून नदीमध्ये दूषित किंवा मैलामिश्रीत पाणी जाऊ नये यासाठी सर्वेक्षण सुरू असून या सर्वेक्षणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. नदीपात्रात कचरा टाकताना कोणी आढळल्यास त्या व्यक्तीचे किंवा त्या परिसराचे छायाचित्र काढून स्मार्ट सारथी ऍपमधील 'पोस्ट अ वेस्ट' या सुविधेच्या आधारे विद्यार्थी महापालिकेशी संपर्क साधू शकतात.

# नवले पुलावर पुन्हा भीषण अपघात!

## कंटेनरच्या धडकेनंतर ट्रकने पेट घेतला, चार जणांचा होरपळून मृत्यू

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुण्यातील नवले पुलाजवळ पुन्हा एकदा जीवघेणा अपघात झाला आहे. कंटेनरची धडक झाल्याने ट्रकने पेट घेतला आणि त्याला आग लागली. या आगीत ट्रकच्या केबीनमध्ये बसून प्रवास करणारे चारजण होरपळून मृत्यूमुखी पडलेत. तर इतर जखमी झालेत. ही आग विझवण्यात अग्नीशमन दलाला यश आलं आहे.**



पुण्यातील नवले पुलावर अपघाताचं सत्र सुरूच असून पुन्हा एकदा जीवघेणा अपघात झाला आहे. हा अपघात नऱ्हे येथील स्वामी नारायण मंदिराजवळ रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास घडला. मक्याचा भुसा घेऊन साताऱ्याच्या दिशेकडून मुंबईच्या दिशेने निघालेला ट्रक नऱ्हे येथील स्वामी नारायण मंदिराजवळ आला असता, ट्रकचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने समोर असणाऱ्या कंटेनरला पाठीमागून जोरदार धडक दिली. यात कंटेनर रस्त्यावरच उलटला. मात्र धडक मोठी बसल्याने ट्रकला क्षणातच आग लागली. यात ट्रकच्या केबिन मध्ये बसलेले चार जणांचा होरपळून जागीच मृत्यू झाला तर दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवून मृतदेह बाहेर काढले.

### चार जणांचा मृत्यू

अपघातानंतर लागलेल्या आगीमध्ये होरपळून मृत्यूमुखी पडलेल्या मृतांचा आकडा चार इतका आहे. तर दोन गंभीर जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ही आग अग्निशमन दलाने नियंत्रणात आणली आहे. परंतु नवले पूल हा किती धोकादायक आहे हे या घटनेवरून पुन्हा एकदा सिद्ध झालं आहे. या पुलाची रचना चुकीची असल्याचं अनेकांनी वेळोवेळी निदर्शनास आणली आहे. परंतु राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाने यावर कोणतीही कारवाई केली नाही.

पुण्यातील नवले पूल हा अपघातांसाठी बदनाम झाला आहे. या पुलावर आतापर्यंत अनेक जीवघेणे अपघात झाले असून त्यामध्ये अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. या पुलावर वारंवार घडणाऱ्या अपघातांच्या मालिकेमुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या विरोधात नागरिक संतप्त झालेले पाहायला मिळत आहेत. याबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी स्थानिकांकडून होते आहे.

### नवले पुलाने आतापर्यंत 70 हून अधिक जणांचा जीव घेतला

सन 2014 पासून आतापर्यंत दरी पूल ते नवले पूल आणि धायरी पूल या साडे तीन किलोमीटरच्या अंतरात तब्बल 186 अपघात झाले आहेत. या अपघातांमधे आतापर्यंत 70 हून अधिक जणांचा मृत्यू झाला असून 145 हून अधिक जण जखमी झाले आहेत.

# भिडे वाडा स्मारकाचा प्रश्न अखेर निकाली!

## उच्च न्यायालयातील खटल्यामध्ये पुणे महापालिकेचा विजय

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या दाम्पत्यानं मुलींची पहिली शाळा पुण्यातील ज्या वाड्यात सुरु केली होती त्या भिडे वाड्याच्या राष्ट्रीय स्मारकासाठीचा न्यायालयीन प्रक्रियेत अडकलेला प्रश्न अखेर निकाली निघाला आहे.**

भिडे वाड्यासंदर्भातील उच्च न्यायालयातील खटल्यामध्ये पुणे महापालिका आणि राज्य सरकारचा विजय झाला आहे. त्यामुळे आता लवकरच या शाळेचे स्मारकात रुपांतर करण्याचे काम तातडीने काम सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी दिली. फुले दाम्पत्याने १ जानेवारी १८४८ रोजी बुधवार पेठ परिसरातील भिडे वाड्यात मुलींसाठी शाळा सुरू केली. त्याचे राष्ट्रीय स्मारक व्हावे अशी मागणी 'मुलींची पहिली शाळा सार्वजनिक स्मारक समिती'च्या वतीनं पुढे आली. शाळेच्या स्थापनेला १९९८ मध्ये दीडशे वर्षे पूर्ण झाली, त्यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव आणि नितीन पवार यांनी या मागणीसाठी फुले वाडा ते भिडे वाडा असा मोर्चा काढला होता. त्या वेळेपासून हे स्मारक करावे, या मागणीने जोर धरला होता.




भिडे वाड्यामध्ये आता दोन गुंठे जागा राहिली आहे. जागा मालक आणि भाडेकरू यांच्यातील वाद न्यायालयात होता. यामध्ये राज्य सरकारनं महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यासाठी गेल्या २३ वर्षांपासून लढा दिला गेला होता. मात्र, हा प्रश्न सुटण्यासाठी अखेर २०२३ हे वर्ष उजाडावे लागले.

> पुणेकरांसाठी आजचा दिवस ऐतिहासिक आहे. भिडे वाड्याचे राष्ट्रीय स्मारक होण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे पडले आहे. त्यासाठी पालकमंत्री या नात्याने मी सातत्याने प्रयत्नशील होतो. शासनाकडून निधीची तरतूद झाल्यानंतर जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांची भेट घेतली होती. या भेटीत त्यांनी भिडे वाड्यासंदर्भातील शासनाच्या भूमिकेसंदर्भात माहिती दिली होती. तसेच उच्च न्यायालयात यासंदर्भात शासनाची भूमिका प्रभावीपणे मांडावी, अशी विनंतीही केली होती. त्यानुसार उच्च न्यायालयाने ही भिडे वाड्याची जागा स्मारकासाठी देण्याच्या बाजूने निकाल दिला.
>
> – **चंद्रकांत पाटील,** उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री

# रोहित पवारांसमोर पक्षवाढीचे आव्हान!

## अंतर्गत मतभेद दूर करण्यासह नव्या नेतृत्व उभारणीसाठीची परिक्षा

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड शहरात खा. शरद पवार यांच्या विचारांची राष्ट्रवादी वाढविण्याची धुरा आमदार रोहित पवार यांच्यावर आली आहे. तेव्हापासून आमदार पवार यांनी शहरात आपला हस्तक्षेप आणि दौरे वाढविले आहेत. मात्र पक्षवाढ करताना पक्षांतर्गत नाराजी, प्रस्थापितांचे आव्हान, नवीन नेतृत्व उभारणी आदी आव्हाने पार करावी लागणार आहेत. हे आव्हान आमदार पवार पेलणार की त्यांना राजकीय अपयश येणार हे येणाऱ्या काळात स्पष्ट होणार आहे.**



काका असणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बालेकिल्ल्यात पुतणे आमदार रोहित पवार यांनी विशेष लक्ष घातले आहे. गणेशोत्सवात पिंपरी-चिंचवड शहरातील तब्बल 35 पेक्षा अधिक गणेश मंडळांना पहाटे तीन वाजेपर्यंत भेटी देऊन संपर्क दांडगा करण्याचा प्रयत्न रोहित पवार यांनी केला. पत्रकार परिषदांमधून आपले स्वतंत्र विचार ठेऊन वेगळा दृष्टीकोन शहरासमोर मांडण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून होत आहे. तर शहरातील विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात त्यांनी लक्ष देखील घालायला सुरूवात केली आहे. उद्या मंगळवारी (दि. 17) रोहित पवारांनी सुरू केलेल्या युवा संघर्ष यात्रेबाबत माहिती देण्यासाठी पत्रकार परिषद देखील आयोजित केली आहे. यामध्ये तरुणांना जोडण्याचा त्यांचा प्रयत्न असणार आहे. या बरोबरच शहरातील विविध ठिकाणी भेटीगाठीचे देखील त्यांचे प्रयोजन आहे. एकूणच आमदार रोहत पवार यांनी एका बाजूला भेटीगाठीचा सपाटा सुरू केला आहे. मात्र दुसरीकडे वाढती आव्हाने देखील आहेत.

शहराध्यक्ष निवडीमध्ये आमदार रोहित पवार यांनी लक्ष घालून माजी नगरसेवक तुषार कामठे यांना पसंती दिली. कामठे यांच्या बाबत आमदार पवारांच्या या हस्तक्षेपामुळे पक्षातील इतर पदाकाऱ्यांमध्ये नाराजीचा सूर उमटला. इतर ज्येष्ठ नेत्यांना डावलून झालेली निवड चुकीची असल्याचे पदाधिकारी वरिष्ठांना सांगू लागले. मात्र त्यामध्ये अपयश न आल्याने कामठे यांची नियुक्ती कायम राहिली. परिणामी शहरात दोन गट पडले असल्याचे चित्र आहे. या दोन्ही गटांना सोबत घेऊन पक्षवाढीसाठी समन्वयक साधण्याचे काम आमदार पवारांना करावे लागणार आहे. या बरोबरच शहरातील विविध पदांवर नियुक्त्या केल्या आहेत. त्याच्या अधिकृत घोषणा करून जनमाणसांत सकारात्मक प्रतिमा निर्माण करणे गरजेचे आहे.

### उपमुख्यमंत्री अजित पवारांसारखा हवा कामाचा व्याप

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या कामाच्या माध्यमातून शहरातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत आपला दरारा निर्माण केला आहे. शहरातील प्रश्नांना शासन दरबारी मांडून त्वरीत सोडविण्याचा सपाटा उपमुख्यमंत्री पवारांचा आहे. त्यांच्या या छबीपुढे दोन पावले पुढे जाऊन आमदार रोहित पवार यांना काम करावे लागणार आहे. उपमुख्यमंत्री पवार यांच्या इतका दांडगा अभ्यास शहराचा करावा लागणार आहे.

### जुन्या पदाधिकाऱ्यांच्या रोषाचा सामना करावा लागणार

» पक्षाच्या शहराध्यक्षपदी तुषार कामठे यांची नियुक्ती केल्यानंतर आमदार रोहित पवार यांनी पहिली पत्रकार परिषद घेतली होती. या पत्रकार परिषदेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भोवती असणाऱ्या चांडाळ चौकटीने पक्ष बुडविल्याचा घणाघात आमदार पवारांनी केला. शहरात सध्या तरी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सोबत असणाऱ्या प्रस्थापित नेत्यांचा दबदबा आहे. राजकीय दिशा बदलण्याची ताकद त्यांच्यामध्ये आहे. शहरातील या नेत्यांना दुखावून आमदार रोहित पवार यांना त्यांच्या रोषाचा सामना करावा लागणार आहे. तसेच या प्रस्थापितांच्या सत्तेला हादरा देऊन नवीन नेतृत्व उभा करावे लागण्याची कसरत करावी लागणार आहे.

# पुणे- मुंबई द्रूतगती मार्गावर 'मेगा ब्लॉक'

## पुण्याकडे जाणारी वाहतूक : गॅन्ट्री उभारण्याचे काम करणार

**। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**भारतीय स्वातंत्र्याचा अमृत म होत्सव साजरा करत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत देशभरातील ५०८ रेल्वे स्टेशनचा पुनर्विकास करण्याचे जाहीर केले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ४४ रेल्वे स्टेशनसह आकुर्डी रेल्वे स्टेशनचा पुनर्विकास करण्यात येणार आहे अशी माहिती पिंपरी चिंचवड शहर जिल्हा भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावर पुणे वाहिनीवर कि.मी. ४०/ १०० ते कि.मी ४०/ ९०० आडोशी येथे हायवे ट्रॉफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत गॅन्ट्री उभारण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत उद्या दि. १७ रोजी करण्यात येणार आहे. त्यामुळे एक तासाचा विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे. यावेळी पुण्याकडे जाणारी वाहतूक दुपारी १२.०० ते दुपारी १.०० या वेळेत पूर्णत: बंद करण्यात येणार आहे. गॅन्ट्री बसविताना सदर कालावधीत पुणे वाहिनीवरील सर्व प्रकारची वाहतूक खालापूर टोल नाका येथे तसेच शोल्डर लेनवर पूर्णपणे थांबविण्यात येणार आहे. फक्त कारसाठी खोपोली एक्झिटवरून जुन्या महामार्गावरून शिंग्रोबा घाटातून मॅजिक पॉईंटवरून द्रुतगती महामार्गावर वळविण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रवाशांनी या महामार्गावरून प्रवास करणे टाळावे, असे सांगण्यात आले आहे. आतापर्यंत तीन वेळा असा ब्लॉक घेण्यात आला आहे. काम लवकर संपत असल्याने ब्लॉक वेळ कमी करण्यात आली आहे.



### वाहनचालकांना आवाहन...

» एका तासानंतर हा मार्ग पुन्हा एकदा सुरू करण्यात येईल. मुंबई - पुणे द्रुतगती मार्गावर दरडी हटविण्यासाठी ब्लॉक घेण्यात आला होता. मुंबई - पुणे ला जोडणारा एक्स्प्रेस महामार्ग हा महत्वाचा आहे. या मार्गावरून लाखोच्या संख्येने अनेक नागरिक प्रवास करतात. मुंबई ते पुणे दररोज अनेक नागरिक प्रवास या मार्गावरून करतात. या रस्त्यावरून दिवसभरात लाखो वाहने ये - जा करत असतात. उद्या एक तासाचा विशेष ब्लॉक घेण्यात येणार असून प्रवाशी नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी या वेळेत प्रवास करणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# "आपले शहर सायकल शहर" या उपक्रमांतर्गत परिसर पर्यावरणपूरक होणार

## शत्रुघ्न काटे यांचे प्रतिपादन



**।पिंपरी । वृत्तसंस्था : महाईन्यूज**

पिंपळे सौदागर हे स्मार्ट सिटी म्हणून झपाट्याने विकसित होत आहे. परिसरात अद्यावत मैदाने, उद्याने, रस्ते विकसित करण्यात आले आहे. तसेच रस्त्याच्या दुतर्फा सायकल ट्रक सुद्धा विकसित करण्यात आले आहे; परंतु त्याचा वापर होताना मात्र दिसून येत नाही, हे खेदजनक आहे. म्हणून "आपले शहर सायकल शहर" उपक्रमांतर्गत अल्प दरात सायकल उपलब्ध करून दिल्यास नक्कीच रस्त्यावर सायकलींचे प्रमाण वाढेले आणि परिणामी सायकल ट्रॅकचा वापर सुद्धा वाढेल, असे प्रतिपादन शत्रुघ्न काटे यांनी केले. "आपले शहर सायकल शहर" या उपक्रम अंतर्गत अल्प दरात दिल्या जाणाऱ्या सायकलचे रविवारी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. "आपले शहर सायकल शहर" या उपक्रम अंतर्गत साधारण १५० पेक्षा जास्त सायकलींचे वाटप आज करण्यात आले. सायकलिंगमुळे शरीराला व्यायाम मिळण्याबरोबरच प्रदूषण रोखण्याची महत्त्वाची जबाबदारी पार पडत असते.

# नेतृत्व : प्रोत्साहन की खच्चीकरण?



## भूमिका

**पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकीसाठी भाजप आणि काँग्रेसचे उमेदवार निश्चित झालेले आहेत. भाजपने तर निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होण्याआधीच छत्तीसगड आणि मध्य प्रदेशमधील उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. जिंकण्याची क्षमता हा उमेदवार निवडीचा पहिला निकष असतो, त्या आधारावर दोन्ही पक्षांनी उमेदवार रिंगणात उतरवलेले आहेत.**



हाच निकष स्थानिक नेतृत्वासाठीही लागू होतो. भाजपने मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या राज्यांतील स्थानिक नेतृत्वावर फारसा विश्वास ठेवलेला नाही असे दिसते. त्या तुलनेत काँग्रेसने मात्र या राज्यांतील स्थानिक नेतृत्वाकडे विधानसभा निवडणुकीची सूत्रे बिनदिक्कतपणे सोपवलेली आहेत. या निवडणुकांमध्ये या दोन्ही राष्ट्रीय पक्षांचा राज्यांतील नेतृत्वाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा असल्याचे प्रकर्षाने जाणवते. मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, मिझोरम आणि तेलंगणा या पाच राज्यांपैकी फक्त मध्य प्रदेशात भाजपची सत्ता आहे. इथे चार वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या शिवराजसिंह चौहान यांनी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाचा विश्वास गमावला असल्याचे दिसते. त्यांना कशीबशी तिसऱ्या यादीत उमेदवारी मिळाली. त्यांच्याकडे निवडणुकीची सूत्रे देण्यात आलेली नाहीत. उलट, शिवराजसिंह चौहान आता निरोपाची भाषा करत आहेत. 'तुम्हाला माझी आठवण येईल'.. 'मी निवडणूक लढावी का?', अशी विचारणा ते मतदारांकडे करत आहेत. असे प्रश्न विचारण्यामागे केंद्रीय नेतृत्वाला दिलेला इशारा असू शकतो. शिवराजसिंह मध्य प्रदेश जिंकून देऊ शकत नाहीत असे भाजपच्या नेतृत्वाला वाटत असले तरी इथे त्यांना तगडा पर्यायही मिळालेला नाही. केंद्रीय मंत्री नरेंद्र तोमर वा अन्य कोणी मध्य प्रदेशचे नेतृत्व करू शकत नाही. दिल्लीच्या वेशीवर कृषी कायद्याविरोधात शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू होते, तेव्हा तोमर किती निष्प्रभ होते ते दिसलेच! मध्य प्रदेश जिंकले तर कदाचित ज्योतिरादित्य शिंदेंकडे बघितले जाऊ शकेल. भाजप निवडणूक बिनचेहऱ्यानेच लढवत आहे. त्यांच्यासाठी कुठल्याही निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी हाच एकमेव चेहरा असतो हा भाग वेगळा! त्या उलट, मध्य प्रदेशमध्ये काँग्रेसने निवडणुकीची सर्व सूत्रे कमलनाथ यांच्याकडे दिलेली आहेत. ज्योतिरादित्य शिंदेंमुळे काँग्रेसची सत्ता गेली तरी पाच वर्षे कमलनाथ मध्य प्रदेशात ठाण मांडून आहेत. गेल्या वेळी कमलनाथ, दिग्विजय सिंह आणि ज्योतिरादित्य शिंदे अशी अंतर्गत रस्सीखेच सुरू होती. यावेळी कमलनाथ यांच्याकडे एकहाती पक्षाची सत्ता देण्यात आली आहे. इथे रणजीत सुरजेवाला यांना निवडणूक प्रभारी नियुक्त केले आहे. कर्नाटकमध्ये सुरजेवाला यांनी सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार यांच्यामध्ये संतुलन आणि समन्वय राखण्याची तारेवरची कसरत यशस्वी केली होती. त्यांच्याबद्दल वेगळ्याच तक्रारी असल्या तरी पक्षनेतृत्वाने सुरजेवालांवर विश्वास ठेवला आहे.

राजस्थानमध्ये भाजपचे सर्वात समर्थ आणि सक्षम नेतृत्व वसुंधरा राजेच आहेत. भाजपच्या नेतृत्वालाही ते माहीत असले तरी राजेंसारख्या- केंद्राला आव्हान देऊ शकणाऱ्या- नेतृत्वाकडे अख्खी निवडणूक सोपवण्याची मोदी-शहांची तयारी नाही. हे दोन्ही नेते राजेंचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व खपवून घेत नाहीत. अपवाद फक्त उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ. त्यांचे व्यक्तिमत्त्वही स्वतंत्र असून त्यांच्याकडेही मोदी-शहांना आव्हान देण्याची क्षमता आहे. पण, सध्या तरी उत्तर प्रदेशमध्ये नेतृत्व बदलाचे धाडस कोणी करू शकत नाही. कर्नाटकप्रमाणे राजस्थानमध्येही पक्ष नवे नेतृत्व पुढे आणत असल्याचा युक्तिवाद केला जात असला तरी, वसुंधरा राजेंचे नेतृत्व नको म्हणून नव्या नेतृत्वाची भाषा केली जात आहे. राजेंकडून नेतृत्व काढून घेतल्यामुळे तिथे भाजपकडे नेतृत्वाची पोकळी निर्माण झालेली आहे. केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, अर्जुनराम मेघवाल अशी वेगवेगळी नावे घेतली जात असली तरी, इथेही त्यांचा विचार निवडणूक जिंकली तरच केला जाईल. कर्नाटकप्रमाणे आता राजस्थानमध्येही भाजपकडे सक्षम प्रादेशिक नेतृत्व उरलेले नाही.

## संपादकीय »

### सूक्ष्माचे सत्य!

***विद्यमान आर्थिक वर्षातील दुसऱ्या, म्हणजे जुलै ते सप्टेंबर या तिमाहीसाठीचे अनेक कंपन्यांचे ताळेबंद गतसप्ताहात प्रसृत झाले.***

माहिती तंत्रज्ञान क्षेत्राची आकडेवारी विशेष लक्षणीय. भारत हा माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीचा देश. या क्षेत्रात भले आपली अशी काही उत्पादने नसतील; परंतु जगातील भल्या भल्या कंपन्या, शासकीय यंत्रणा यांस सेवा पुरवण्यात आपला हात धरणारा कोणी नाही. म्हणजे ॲपल, मायक्रोसॉफ्ट, गूगल वा ॲमेझॉन यांच्याइतके आपल्या सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर क्षेत्राचे यश नाही.

या कंपन्यांची यंत्रणा सांभाळणे, सरकारी-निमसरकारी यंत्रणांतील कर्मचाऱ्यांचे वेतन-निवृत्तिवेतन यांचा हिशेब राखणे, विविध आस्थापनांच्या कार्मिक नोंदी हाताळणे आदी 'सेवा' पुरवण्यात भारतीय माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या अत्यंत अव्वल. याबाबत आपली विश्वासार्हताही उच्च दर्जाची. त्यामुळे देशोदेशींची सरकारे असोत वा बडय़ा कंपन्या; त्यांचे कार्यालयीन व्यवहार आपल्या कंपन्या अत्यंत कार्यक्षमतेने हाताळतात.

**देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील बेस्ट सेवा हा एकेकाळी शहराच्या शिरपेचातील मानाचा तुरा होती. आजही इतर राज्यांत बससेवा सुरू करताना आधी 'बेस्ट' बससेवेचा अभ्यास केला जातो. अशा या सार्वजनिक वाहतुकीच्या महत्त्वपूर्ण साधनाचे खासगीकरण करण्याच्या डावात राज्य सरकार आणि खुद्द बेस्ट प्रशासनही सामील आहे.**

# समान वेतनासाठी किती काळ लढा द्यायचा?

बेस्टला संपवण्याचा सरकारचा मानस आहे. त्याची सुरुवात त्यांनी बेस्टचा स्वतःचा ताफा कमी करून खासगी कंत्राटदारांना बसगाड्या चालविण्याची परवानगी देऊन केली आहे. हे कंत्राटदार स्वतःचा फायदा व्हावा यासाठी कामगारांची पिळवणूक करून नफा कमवत आहेत. बेस्टने नेहमीच मुंबईकरांना साथ दिली आहे. मुंबई पावसाच्या पाण्यामुळे तुंबली आणि शहराची जीवनवाहिनी असलेली रेल्वेसेवा बंद पडली, त्या प्रत्येक वेळी बेस्टने नेटाने सेवा दिली, हे कोणताही मुंबईकर विसरू शकत नाही. मुंबईतील नोकरदार महिलावर्ग बिनदिक्कत रात्रीचा व पहाटेचा प्रवास करू शकतो, तो या बेस्ट सेवेमुळेच! मुंबईत कामगारवर्ग मोठ्या प्रमाणात राहतो. या सर्वांना कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी या परवडणाऱ्या आणि शहराच्या कानाकोपऱ्यांत जाणाऱ्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची मोलाची मदत होते. मुंबईतील



जनतेच्या रोजच्या जीवनाचा बेस्ट बस हा जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यांच्या गरजेचा भाग आहे. बेस्ट बस प्रशासन त्याच गोष्टीचा फायदा घेऊन जनतेला वेठीस धरून ही सार्वजनिक वाहतूक सेवा खासगी करण्याच्या प्रयत्नात आहे. बेस्टचे खासगीकरण झाल्यास सामान्य जनतेकडून वसूल केलेला पैसा नफा म्हणून वापरणे शक्य होईल. आताही नफा कमविण्यासाठी हलक्या प्रतीच्या बस उपलब्ध करून दिल्या जात आहेत. कामगार व प्रवाशांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. कामगारांच्या प्रशिक्षणावरचा खर्च कमी करून प्रवाशांचा व खुद्द त्या कामगारांचाही जीव धोक्यात घातला जात आहे. कमी पगारात हे कर्मचारी काम करत आहेत. कामाच्या ठिकाणी त्यांचा मानसिक छळ होतो. कामगार कायद्यातील कामगार या संज्ञेच्या व्याख्येत हे वेट लीज कामगार बसत नाहीत. त्यामुळे सगळे कामगार कायदे धाब्यावर बसवून कंत्राटदार पिळवणूक करतात. परिणामी हे कंत्राटी कामगार अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जगत आहेत. तुटपुंज्या पगारामुळे हताश व कर्जबाजारी होऊन त्यापैकी काहींनी आत्महत्या केली. सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले आहे की कल्याणकारी राज्यात 'समान कामाला समान वेतन' नाकारणे हे शोषण आहे. या महत्वपूर्ण निरीक्षणाच्या सहाय्याने 'संघर्ष कर्मचारी कामगार युनियन' गेली दोन- तीन वर्षे कामगारांवरील अन्यायविरुद्ध आवाज उठवत आहे. आंदोलने करत आहे. वेट लीजचे सुमारे नऊ हजार कामगार या आंदोलनांत सहभागी होतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शासकीय जागेवर बिल्डरची नजर!

## बोरवणकरांचा पुन्हा पालकमंत्री अजित पवारांवर आरोप

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुणे शहराच्या माजी पोलीस आयुक्त मीरा बोरवणकर यांच्या मॅडम कमिशनर या पुस्तकात अजित पवारांचा उल्लेख आल्याने मोठी खळबळ माजली आहे. पुण्याचे मध्यवर्ती कारागृह येरवडा कारागृहाचा लिलाव पूर्ण झाला असून त्याचे हस्तांतरण करण्याच्या सूचना तत्कालीन पालकमंत्री (अजित पवार) यांनी केला होता, असा दावा या पुस्तकात करण्यात आला आहे.**




यावरून राज्यात अजित पवारांविरोधात जोरदार चर्चा झाली असून मीरा बोरवणकर यांनी आता पुन्हा मोठा दावा केला आहे. तत्कालीन मंत्री यांनी जागेचा लिलाव यशस्वी झाला असून जागेचा ताबा सर्वाधिक बोली लावण्याऱ्याला देण्यास सांगितलं होतं. परंतु, येरवडा कारागृह ही प्राईम जागा आहे. क्वाटर्ससाठीही अशी जागा पुन्हा मिळणार नाही. तसंच, लिलाव आधीच पूर्ण झाला होता, मग तेव्हाच हस्तांतरण का झालं नाही असा सवालही पुस्तकातून विचारण्यात आला आहे, असं मीरा बोरवणकर आज पत्रकार परिषदेत बोलल्या. तसंच, शासकीय जागेवर बिल्डरची नजर असतेच, त्याला वाचवणं आणि सार्वजनिक हितासाठी वापरणं ही आपली जबाबदारी आहे, असंही त्या म्हणाल्या. "पुस्तक लिहिल्यापासून अनेक पोलिसांचे फोन येत आहेत. तुमच्यामुळे आमची जागा वाचली असं ते म्हणत आहेत. असंच प्रकरण औरंगाबादेतही झालं होतं. हायकोर्टाचे रिटायर्ड न्यायमूर्ती बी. एच मल्ला पल्ले यांनी पाठवलं आहे. ते म्हणाले की असं एक प्रकरण औरंगाबादलाही झालं होतं. गारखेडा नावाची जागा होती, कोणीतरी खासगी मालकाला देण्यात आली होती. ती जागा ५० एकर होती. त्यावेळी दोन शासकीय अधिकारी बी. रमणी आयुक्त होते आणि राधा मॅडम जिल्हाधिकारी होत्या. त्यांनी ही जागा हस्तांतरित करण्यासा नाकारलं होतं, मग हायकोर्ट आणि सुप्रिम कोर्टातही ते गेले आणि त्यांनी ती जागा वाचवली", असं उदाहरणही त्यांनी दिलं. या पुस्तकाला राजकीय रंग दिला जातोय, असा आरोप केला जातोय. यावर मीरा बोरवणकर म्हणाल्या की, "हे पुस्तक वर्षभरापूर्वी संपादनासाठी दिला होता. दोन महिन्यांपासून हे पुस्तक प्रिंटिंगला होते. त्यामुळे हे पुस्तक राजकीय नाही. शासकीय जागा बिल्डरांच्या घशात घातल्या जात आहेत, यामागे परस्पर हितसंबंध असल्याचीही दबक्या आवाजात चर्चा आहे, असा प्रश्न पत्रकारांकडून विचारण्यात आला आहे. त्यावर मीरा बोरवणकर म्हणाल्या की, "बिल्डर, अधिकारी, राजकीय नेते आणि पोलीस यांचे हितसंबंध आहेत. हे वाक्य मी अंडरलाईन करेन. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावंच लागणार आहे. येरवडा कारागृहाबाबत मॅडम कमिश्नर या पुस्तकातून समोर आल्यानंतर राज्यातील इतर शासकीय जागांचीही चौकशी व्हावी, असं मत मीरा बोरवणकर यांनी व्यक्त केलं आहे. त्या म्हणाल्या की, "एवढ्या मोठ्या प्रमाणावर फोन कॉल आणि मेसेज येऊ लागल्या आहेत, त्यानुसार मला आता वाटतंय की जिथे जिथे खासगी व्यावसायिकांना जागा दिल्या आहेत, तिथे तिथे पुन्हा तपासणी करण्याची गरज आहे", असंही त्या म्हणाल्या.

### अन् ती जागा वाचवली...

» शासकीय जागा बिल्डरांच्या घशात घातल्या जात आहेत, यामागे परस्पर हितसंबंध असल्याचीही दबक्या आवाजात चर्चा आहे, असा प्रश्न पत्रकारांकडून विचारण्यात आला आहे. त्यावर मीरा बोरवणकर म्हणाल्या की, "बिल्डर, अधिकारी, राजकीय नेते आणि पोलीस यांचे हितसंबंध आहेत. हे वाक्य मी अंडरलाईन करेन. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावंच लागणार आहे. ती जागा ५० एकर होती. त्यावेळी दोन शासकीय अधिकारी बी. रमणी आयुक्त होते आणि राधा मॅडम जिल्हाधिकारी होत्या. त्यांनी मग हायकोर्ट आणि सुप्रिम कोर्टातही ते गेले आणि त्यांनी ती जागा वाचवली", असं उदाहरणही त्यांनी दिलं.

# कुठला लांडगा भांडण लावतो?

## गोपीचंद पडळकरांची शरद पवारांवर टीका

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा 'लबाड लांडग्याचं लबाड पिल्लू' असा उल्लेख करत टीका केली होती. यानंतर गोपीचंद पडळकरांवर अजित पवार गटाकडून समाचार घेण्यात आला होता. आता पुन्हा गोपीचंद पडळकर यांनी अप्रत्यपक्षणे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना लक्ष्य केलं आहे.**




"महाराष्ट्रात कुठला लांडगा भांडण लावतो, हे सर्व लोकांना माहिती आहे. रिपाई पक्षांचे तुकडे कुठल्या लांडग्यानं केले? बी के यांच्या पाठीत कुणी खंजीर खुपसला? धनगरांना एसटीऐवजी एनटीचा दाखला कुठल्या लांडग्यानं दिला?" असे सवाल उपस्थित करत पडळकरांनी शरद पवारांवर हल्लाबोल केला. माझ्यावर दोनदा हल्ला झाला. सोलापुरात दगड माझ्या गाडीवर टाकण्यात आला. मी धनगर आणि भटक्या समाजासाठी काम करतोय. धनगर समाजाची जागर यात्रा काढल्यानं आम्ही स्पर्धेत येऊ शकतो, हे प्रस्थापितांना माहिती आहे.

त्यामुळे हे थांबवायचं असेल, तर मला थांबवावं लागेल. पण, काहीही झाले, तरी धनगर आरक्षणाची चळवळ थांबू नये," असं गोपीचंद पडळकरांनी म्हटलं. धनगर समाजाबद्दल अजित पवार यांची भावना स्वच्छ नाही. म्हणून धनगर आरक्षणाबाबत अजित पवार यांना पत्र देण्याची गरज नाही. अजित पवार लबाड लांडग्याचं लबाड पिल्लू आहेत. अजित पवारांना आम्ही मानत नाही आणि कधी पत्रही दिलं नाही.

### माझ्यावर दोनदा हल्ला

» "माझ्यावर दोनदा हल्ला झाला. सोलापुरात दगड माझ्या गाडीवर टाकण्यात आला. मी धनगर आणि भटक्या समाजासाठी काम करतोय. धनगर समाजाची जागर यात्रा काढल्यानं आम्ही स्पर्धेत येऊ शकतो, हे प्रस्थापितांना माहिती आहे. त्यामुळे हे थांबवायचं असेल, तर मला थांबवावं लागेल. पण, काहीही झाले, तरी धनगर आरक्षणाची चळवळ थांबू नये," असं गोपीचंद पडळकरांनी म्हटलं.

# नगर-आष्टी रेल्वेचे पाच डबे आगीत भस्मसात

। नगर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

नगरहून आष्टीकडे जाणाऱ्या प्रवासी डेमू रेल्वेला आग लागून पाच डबे जळून भस्मसात झाले. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही किंवा कोणास दुखापतही झाली नाही. घटना आज, सोमवारी दुपारी ३ च्या सुमारास नगर शहराजवळील शिराढोण ते वाळुंज फाटा या दरम्यान घडली. या रेल्वेत तुरळक ८ ते १० प्रवासी होते. प्रवाशांनी जीवाच्या भीतीने, वेग कमी झाल्यानंतर धावत्या रेल्वेतून उड्या मारल्या. बहुचर्चित व बहुप्रतिक्षित नगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचे काम सुरू आहे. त्यातील पहिल्या टप्प्याचे, नगर ते आष्टी या रेल्वेरुळाचे काम पूर्ण होऊन गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये ही रेल्वे सुरु करण्यात आली. सुरुवातीला सकाळी व संध्याकाळी अशा दोन फेऱ्या सुरू करण्यात आल्या होत्या. मात्र प्रवाशांचा प्रतिसादच नसल्याने काही दिवसातच एक फेरी कमी करण्यात आली. आज दुपारी नगरहून आष्टीकडे जाणाऱ्या रेल्वे गाडीच्या पहिल्याच डब्याला आग लागली व ती पसरत गेली. राष्ट्रीय महामार्गाचे काम करणारे रस्त्यावरील मजूर व वाळुंज ग्रामस्थांच्या लक्षात आग लागल्याची बाब आली. त्यांनी आरडाओरडा करत माहिती दिली तसेच रेल्वे प्रशासन व नगर महापालिकेच्या अग्निशमन विभागाला कळवले. मनपा तसेच संरक्षण विभागाच्या सीक्यूएव्ही, व्हीआरडीई व नगर एमआयडीसीचे सहा बंब आग विझवण्यासाठी धावले. तोपर्यंत पाच डबे आगीच्या भक्षस्थानी पडले होते.

# राहुल गांधींची मिझोराममध्ये पदयात्रा!

## राहुल गांधी यांचा पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेस नेते राहुल गांधी सोमवारी मिझोराममधील ऐझवाल येथे पोहोचले. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राहुल यांनी येथे जाहीर सभेला संबोधित केले. मणिपूरमधील घटनांचा संदर्भ देत राहुल यांनी पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला. काही महिन्यांपूर्वी मी मणिपूरला गेलो होतो. मणिपूरची संकल्पना भाजपने उद्ध्वस्त केली आहे. आता एक राज्य नाही तर दोन राज्ये झाली आहेत. लोकांच्या हत्या झाल्या, महिलांचा विनयभंग झाला पण पंतप्रधानांना तिथे भेट देणं महत्त्वाचं वाटत नाही.**

याआधी राहुल यांनी 5 किमी लांबीची पदयात्रा काढली. राहुल यांनी आपल्या पदयात्रेला चेनमरी येथून सुरुवात केली, ती ट्रेझरी स्वायर येथे संपली. यावेळी राहुल यांनी स्थानिक लोकांची भेट घेतली. या दौऱ्याच्या माध्यमातून राहुल मिझोरामच्या लोकांना विशेषत: तरुणांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करणार आहेत. मिझोराम काँग्रेस मीडिया सेलचे अध्यक्ष लालरेमृता रंथाली यांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुल त्यांच्या ऐझवाल दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी पक्षाच्या नेत्यांना भेटतील आणि पत्रकार परिषदेला संबोधित करतील. राहुल राज्याच्या दक्षिणेकडील लुंगलेई शहरालाही भेट देतील आणि तेथे जाहीर सभा घेणार आहेत.

राहुल मंगळवारी लुंगलेई येथून हेलिकॉप्टरने आगरतळामार्गे दिल्लीला रवाना होतील, असे त्यांनी सांगितले. 40 सदस्यीय मिझोराम विधानसभेसाठी एकाच टप्प्यात 7 नोव्हेंबर रोजी निवडणूक होणार असून मतमोजणी 3 डिसेंबर रोजी होणार आहे.



निवडणुकीच्या तारखेबाबत मात्र राज्यातील काही राजकीय पक्ष, चर्च, नागरी संस्था आणि विद्यार्थी संघटनांनी मतमोजणीची तारीख बदलण्याची विनंती निवडणूक आयोगाकडे केली आहे. कारण तो दिवस रविवार असून तो राज्यातील ख्रिश्चन समाजासाठी पवित्र दिवस आहे. 2011 च्या जनगणनेनुसार, मिझोरामची सुमारे 87 टक्के लोकसंख्या ख्रिश्चन आहे. सत्ताधारी मिझो नॅशनल फ्रंट (MNF) आणि मुख्य विरोधी झोरम पीपल्स मूव्हमेंट (ZPM) यांनी आधीच सर्व 40 जागांसाठी त्यांच्या उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. काँग्रेसने सर्व जागांवर निवडणूक लढवणार असल्याचे सांगितले. राहुल गांधी यांच्या दौऱ्यात उमेदवारांची यादी जाहीर होण्याची शक्यता आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत 40 विधानसभा जागांसाठीच्या उमेदवारांची नावे जाहीर करणार असल्याचे भाजपने म्हटले आहे. गेल्या वर्षी 6 सप्टेंबर रोजी कन्याकुमारी येथून सुरू झालेल्या 'भारत जोडो यात्रे'च्या धर्तीवर राहुल गांधी सोमवारी ऐझवालमधून पदयात्रा सुरू करणार आहेत. मिझोरम विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट होणार आहे. भारत जोडो यात्रा 150 दिवसांत 3500 किमी पेक्षा जास्त पायी चालत 12 राज्यांतून काश्मीरमध्ये संपली.

### मिझोराममध्ये 7 नोव्हेंबरला निवडणूक

» 40 सदस्यीय मिझोराम विधानसभेसाठी एकाच टप्प्यात 7 नोव्हेंबर रोजी निवडणूक होणार असून मतमोजणी 3 डिसेंबर रोजी होणार आहे. निवडणुकीच्या तारखेबाबत मात्र राज्यातील काही राजकीय पक्ष, चर्च, नागरी संस्था आणि विद्यार्थी संघटनांनी मतमोजणीची तारीख बदलण्याची विनंती निवडणूक आयोगाकडे केली आहे. कारण तो दिवस रविवार असून तो राज्यातील ख्रिश्चन समाजासाठी पवित्र दिवस आहे. राहुल राज्याच्या दक्षिणेकडील लुंगलेई शहरालाही भेट देतील आणि तेथे जाहीर सभा घेणार आहेत. राहुल मंगळवारी लुंगलेई येथून हेलिकॉप्टरने आगरतळामार्गे दिल्लीला रवाना होतील, असे त्यांनी सांगितले.

# समलिंगी विवाहाचा निर्णय उद्या येणार?

## विशेष विवाह कायद्यांतर्गत नोंदणीची मागणी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**समलैंगिक विवाह प्रकरणी प्रदीर्घ सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालय मंगळवारी (17 ऑक्टोबर) सकाळी 10.30 वाजता निकाल देऊ शकते. समलैंगिक विवाहाचे समर्थन करणाऱ्या याचिकाकर्त्यांनी विशेष विवाह कायद्यांतर्गत नोंदणी करण्याची मागणी केली आहे. त्याचबरोबर केंद्र सरकारने याला भारतीय समाजाच्या विरोधात म्हटले आहे.**



सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांमध्ये याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे की, 2018 मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने समलैंगिकता हा गुन्हा मानणाऱ्या आयपीसीच्या कलम 377 चा एक भाग रद्द केला होता. या निर्णयानंतर दोन प्रौढ व्यक्तींनी परस्पर संमतीने समलैंगिक संबंध ठेवले तर तो गुन्हा नाही. अशा स्थितीत समलिंगी विवाहाला मान्यता द्यायला हवी. सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. दहा दिवसांच्या सुनावणीनंतर खंडपीठाने 11 मे रोजी या प्रकरणावरील निर्णय राखून ठेवला होता. सीजेआय डीवाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील घटनापीठात न्यायमूर्ती संजय किशन कौल, एस रवींद्र भट, हिमा कोहली आणि पीएस नरसिम्हा यांचा समावेश होता. समलैंगिक विवाहाला कायदेशीर मान्यता मिळावी यासाठी 20 याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सात दिवसांच्या सुनावणीनंतर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयात सांगितले की, समस्यांवर तोडगा काढण्यासाठी केंद्र एक समिती स्थापन करण्यास तयार आहे.

या जोडप्यांच्या लग्नाला कायदेशीर मान्यता देण्याच्या मुद्द्यावर ही समिती प्रवेश करणार नाही, असे मेहता म्हणाले होते. याचिकाकर्ते म्हणजेच समलिंगी जोडपे समस्यांबाबत त्यांच्या सूचना देऊ शकतात. त्यांनी काय पावले उचलली जाऊ शकतात ते आम्हाला सांगू द्या. सरकार याबाबत सकारात्मक आहे. होय, हे नक्कीच खरे आहे की, या प्रकरणात एक नव्हे तर अनेक मंत्रालयांमध्ये समन्वयाची गरज आहे. सुप्रीम कोर्टाने केंद्र सरकारला विचारले होते की, 'न्यायपालिकेने यात प्रवेश केला तर हा कायदेशीर मुद्दा बनेल. सरकारने या संदर्भात काय करायचे आहे आणि अशा लोकांच्या सुरक्षिततेसाठी आणि कल्याणासाठी ते कसे कार्य करत आहे हे स्पष्ट केले पाहिजे. समलैंगिकांना समाजातून बहिष्कृत करता येत नाही.

### नव्या उद्देशाने नवा वर्ग निर्माण व्हावा

» केंद्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले होते, 'विशेष विवाह कायदा केवळ विरुद्ध लिंगाच्या लोकांसाठी आहे. ते वेगवेगळ्या धर्माच्या लोकांसाठी आणले होते. सरकार प्रत्येक वैयक्तिक संबंध ओळखण्यास बांधील नाही. नव्या उद्देशाने नवा वर्ग निर्माण व्हावा, अशी याचिकाकर्त्यांची इच्छा आहे. याची कल्पनाही केली नव्हती.

# कोल्लमच्या प्रत्येक घरात संविधानाची प्रस्तावना!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

केरळमध्ये एक असा जिल्हा आहे जिथे नागरिकांना संविधानातील मुख्य मुद्दे माहित आहेत. या जिल्ह्याचे नाव कोल्लम आहे. येथे 10 वर्षे ओलांडलेल्या प्रत्येक बालकाला राज्यघटनेचे मूलभूत ज्ञान आहे.

दोन वर्षांपूर्वी केरळच्या नागरिकांना संविधान साक्षर करण्यासाठी एक मोहीम सुरू करण्यात आली होती, त्याचे नाव होते 'नागरिक कार्यक्रम'. घटनात्मकदृष्ट्या साक्षर झाल्यामुळे येथील रहिवाशांना अनेक सामाजिक समस्यांना सामोरे जाण्यास मदत झाली आहे.

भारताची राज्यघटना सहजासहजी वाचून समजत नाही. त्यात प्रस्तावना, 12 अनुसूची आणि 105 सुधारणांसह 25 भागांमध्ये 470 लेख आहेत. वकिलांनाही ते पूर्णपणे समजून घेण्यात अडचण येते. त्यामुळे केरळ इन्स्टिट्यूट ऑफ लोकल ॲडमिनिस्ट्रेशन KILA ने संविधानाची एक आवृत्ती तयार केली जी सहज समजेल. संविधानातील महत्त्वाच्या तरतुदी त्यांच्या दैनंदिन जीवनाशी जोडून स्पष्ट केल्या आहेत. यामुळे लोकांना विशेषत: महिलांना त्यांच्या ज्ञात भाषेत आणि संदर्भांमध्ये संविधानाबद्दल वादविवाद आणि चर्चा करण्यास सक्षम केले आहे. नागरिक कार्यक्रमांतर्गत, 10 वर्षांवरील 22 लाखांहून अधिक नागरिक (7 लाख कुटुंबे) घटनात्मक साक्षर झाले आहेत. या कार्यक्रमांतर्गत पहिल्या टप्प्यात सुमारे 12 हजार कुटुंबांनीही संविधान या विषयावर परीक्षा दिली. पहिल्या 100 कुटुंबांना आदरांजली म्हणून टीव्ही-फ्रिज सारख्या भेटवस्तू देण्यात आल्या. कोल्लमचे रहिवासी पोलीस हवालदार एस. साजीन सांगतात, 'या उपक्रमामुळे ते सर्व नागरिकांकडे सामान्य नजरेने पाहू लागले. राज्यघटनेचे ज्ञान मिळाल्याने स्थानिक समुदाय आणि पोलिस यांच्यातील संबंध अधिक चांगले झाले आहेत.

# देशभरात नवरात्रीच्या उत्सवाला विशेषत: महत्त्वाचे स्थान!

पुणेः नवरात्र हा एक हिंदू सण आहे. जो देशात वर्षातून दोनदा साजरा केला जातो. चैत्र महिन्यात, म्हणजे चैत्र नवरात्री (मार्च-एप्रिल) आणि शारदा नवरात्री 2023 (ऑक्टोबर-नोव्हेंबर). नवरात्री या शब्दाचा अर्थ संस्कृतमध्ये नऊ रात्री असा होतो. आणि हा सण या दोन्ही महिन्यांत नऊ दिवसांचा असतो. या नऊ दिवसांसाठी, नऊ नवरात्रीचे रंग नियुक्त केले आहेत, प्रत्येकाचे स्वतःचे नवरात्री रंगाचे महत्त्व आहे. तसेच, सणांमध्ये भर घालण्यासाठी, लोक अनेकदा नवरात्रीच्या रंगांनुसार त्यांच्या नवरात्रीच्या मंदिराची सजावट घरी करतात. नवरात्रीच्या उत्सवाला विशेषतः भारतीय घरांमध्ये महत्त्वाचे स्थान आहे.





देशाच्या विविध भागात नवरात्र वेगवेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते. तथापि, हिंदू देवी काली किंवा दुर्गा यांचा विजय ही नवरात्र उत्सवामागील मूळ संकल्पना आहे. देशभरातील असंख्य स्त्रिया नवरात्रीला प्रिय आहेत. ज्या उपवास करतात आणि नवरात्री दरम्यान विशेष पदार्थ आणि पेये घरी बनवतात. नवरात्रोत्सवाच्या या ९ दिवसांत ते कपडे घालून मित्र आणि कुटुंबाला भेट देतात.

शारदीय नवरात्री 2023 चे नऊ रंग येथे आहेत. ज्यांबद्दल तुम्हाला माहित असले पाहिजे. नवरात्रोत्सव संपेपर्यंत दररोज यापैकी एका नवरात्रीच्या रंगात कपडे घालण्यासह आपल्या नवरात्रीच्या मंदिराच्या सजावटीसाठी ही थीम घरच्याघरी असणे खूप खास मानले जाते.

जर तुम्ही शारदीय नवरात्रीच्या तारखांबद्दल विचार करत असाल, तर शारदीय नवरात्री 2023 हा 15 ऑक्टोबर 2023 ते 24 ऑक्टोबर 2023 या कालावधीत साजरा केला जाईल. 24 ऑक्टोबर हा दसरा आहे. तर, आपल्या शरद नवरात्रीच्या मंदिराची सजावट घरातूनच सुरू करा आणि नवरात्रीच्या रंगांनुसार 2023 नुसार आपल्या दैनंदिन पोशाखांची योजना करण्यास विसरू नका.



# ऑस्ट्रेलियाने उघडले विजयाचे खाते!

## » ऑस्ट्रेलियाने श्रीलंकेचा 6 विकेट्स राखून केला पराभव

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**वर्ल्डकप 2023 च्या 14 व्या सामन्यात आज (दि. 16, सोमवार) ऑस्ट्रेलियाने श्रीलंकेचा 6 विकेट्स राखून पराभव करत स्पर्धेतील पहिल्या विजयाची नोंद केली. कांगारूंनी आपल्या भेदक मा-याच्या जोरावर श्रीलंकेचा डाव 43.3 षटकांत 209 धावांत गुंडाळला होता. त्यानंतर ऑस्ट्रेलियाने 35.2 षटकांत 5 गड्यांच्या मोबदल्यात लक्ष्याचा यशस्वीरित्या पाठलाग केला. मिचेल मार्शने 52 आणि जोश इंग्लिसने 58 धावांची खेळी साकारली.**




210 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची सुरुवात खराब झाली त्यांनी 24 धावांत 2 गडी गमावले. त्यानंतर मार्शने आणि इंग्लिश यांनी अर्धशतकी खेळी केली. इंग्लिशने सर्वाधिक 58, तर मार्शने 52 धावांची खेळी केली. लॅबुशेनने 40 धावा केल्या आणि इंग्लिशसोबत चौथ्या विकेटसाठी 77 धावांची भागीदारी करत संघाला विजयाच्या जवळ नेले. ग्लेन मॅक्सवेल 31 आणि मार्कस स्टॉइनिस 20 धावांवर नाबाद राहिले. डेव्हिड वॉर्नर 11 धावा करून बाद झाला. स्टीव्ह स्मिथला खातेही उघडता आले नाही. श्रीलंकेकडून दिलशान मदुशंकाने तीन तर दुनिथ वेल्लालागेने बळी घेतला. तत्पूर्वी, श्रीलंकेचा कर्णधार कुसल मेंडिसने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. लखनौ येथील भारतरत्न श्री अटल बिहारी वाजपेयी क्रिकेट स्टेडियमवर (इकाना) हा सामना रंगला होता. श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना दमदार सुरुवात केली. सलामीवीर फलंदाज कुसल परेरा आणि पथुम निसांका यांनी पहिल्या विकेटसाठी 125 धावांची भागीदारी केली. पण या चांगल्या सुरुवातीचा लंकन संघाला फायदा उठवता आला नाही. निसांका 61 धावा करून बाद झाला. त्यानंतर कुसल मेंडिसही लगेचच 78 धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. हे दोघे बाद झाल्यानंतर लंकेचा संघ 209 धावांवर गडगडला. निसांका आणि मेंडिस व्यतिरिक्त फक्त चरित अस्लंकाला दुहेरी आकडा गाठता आला. त्याने 25 धावा केल्या. दासून शनाका वर्ल्डकपमधून बाहेर पडल्यानंतर कर्णधार पदाची जबाबदारी सांभाळणा-या कुसल मेंडिसला केवळ नऊ धावा करता आल्या. पाकिस्तानविरुद्ध शतक झळकावणारा सदीरा समरविक्रमा आठ धावांवर बाद झाला. धनंजय डी सिल्वा सात आणि लाहिरू कुमारा चार धावा करून माघारी परतले. चमिका करुणारत्ने आणि दुनिथ वेललागे यांना प्रत्येकी दोनच धावा करता आल्या. महिशला तिक्षणाला तर खातेही उघडता आले नाही. तर, दिलशान मदुशंका खाते न उघडता नाबाद राहिला. ऑस्ट्रेलियाकडून लेगस्पिनर ॲडम झाम्पाने सर्वाधिक चार विकेट घेतल्या. तर मिचेल स्टार्क आणि पॅट कमिन्स यांना प्रत्येकी दोन बळी मिळवण्यात यश आले. ग्लेन मॅक्सवेलने एक विकेट घेतली. ऑस्ट्रेलियाने श्रीलंकेवर ५ विकेट्स आणि ८८ चेंडू राखून विजय मिळवला आहे. या विजयासह ऑस्ट्रेलियाने दोन गुण तर कमावले पण त्याचबरोबर त्यांचा रन रेट चांगला झाला आहे. त्यामुळे ऑस्ट्रेलियाच्या संघाने या विजयानंतर दहाव्या स्थानावरून आठव्या स्थानावर झेप घेतली आहे.

### लॅबुशेन-इंग्लिशची उपयुक्त भागिदारी

» 210 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची सुरुवात खराब झाली त्यांनी 24 धावांत 2 गडी गमावले. त्यानंतर मार्शने आणि इंग्लिश यांनी अर्धशतकी खेळी केली. इंग्लिशने सर्वाधिक 58, तर मार्शने 52 धावांची खेळी केली. लॅबुशेनने 40 धावा केल्या आणि इंग्लिशसोबत चौथ्या विकेटसाठी 77 धावांची भागीदारी करत संघाला विजयाच्या जवळ नेले. ग्लेन मॅक्सवेल 31 आणि मार्कस स्टॉइनिस 20 धावांवर नाबाद राहिले. डेव्हिड वॉर्नर 11 धावा करून बाद झाला. स्टीव्ह स्मिथला खातेही उघडता आले नाही. श्रीलंकेकडून दिलशान मदुशंकाने तीन तर दुनिथ वेल्लालागेने बळी घेतला.

# महाराष्ट्र संघाची विजयी घोडदौड!

## » लक्षद्वीप संघाला 4-0 ने दिली एकतर्फी मात

।कोल्हापूर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**संतोष ट्रॉफी फुटबॉल स्पर्धेमध्ये रविवारी महाराष्ट्र संघाने लक्षद्वीप संघावर 4-0 अशी एकतर्फी मात करत विजयी घोडदौड कायम ठेवली. अखिल भारतीय फुटबॉल महासंघ, वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन आणि कोल्हापूर स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शाहू स्टेडियमवर ही स्पर्धा सुरू आहे.**




सकाळच्या सत्रातील सामन्यात यजमान महाराष्ट्र आणि लक्षद्वीप संघामध्ये सामना खेळवण्यात आला. सामन्यात आठव्या मिनिटाला अद्वैतने मैदानी गोल नोंदवत महाराष्ट्र संघाला 1-0 गोलची आघाडी मिळवून दिली. सामना बरोबरीत आणण्यासाठी लक्षद्वीप संघाने वेगवान चढाया केल्या. मात्र, महाराष्ट्राची बचाव फळी भेदणे त्यांना शक्य झाले नाही. महाराष्ट्र पूर्वार्धात 1-0 गोलनी आघाडीवर होता. सामन्याच्या 69 व्या मिनिटाला महाराष्ट्राच्या अर्नेश अन्सारीने वैयक्तिक पहिला, तर संघासाठीचा दुसरा गोल नोंदवला. कोल्हापूरचा खेळाडू व संघाचा कर्णधार निखिल कदम याने 68 व्या मिनिटाला गोल नोंदवत आघाडी 3-0 अशी भक्कम केली, तर हिमांशू पाटीलने सामन्याच्या 78 व्या मिनिटाला संघाच्या चौथ्या गोलची नोंद केली. महाराष्ट्र संघाने 4-0 या गोलसंख्येच्या जोरावर सामन्यात एकतर्फी विजय मिळवला. दुपारच्या सत्रात तेलंगणाविरुद्ध आंध— प्रदेश यांच्यातील सामना गोलशून्य बरोबरीत राहिला. सायंकाळच्या सत्रातील अंदमान-निकोबार व त्रिपुरा यांच्यातील सामना गोलशून्य बरोबरीत राहिला. त्रिपुराच्या भत्ती जमाती याने खेळाडूंना अवैद्यरीत्या आडविल्याने दोन यलो कार्ड इशारा देऊन पंच सुनीलकुमार के. जी. यांनी त्याला रेड कार्ड दाखवून मैदानाबाहेर काढले.

# डेव्हिड वॉर्नरचे कौतुक!

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

ऑस्ट्रेलियन डावखुरा फलंदाज डेव्हिड वॉर्नर आपल्या उत्कृष्ट फलंदाजीबरोबरच चाहत्यांचेही मनोरंजन करतो. मात्र, यावेळी त्याने सर्वासमोर एक आदर्श ठेवत चाहत्यांची मने जिंकली. वास्तविक, वॉर्नरने पावसात मैदानावरील कव्हर्स ओढण्यात ग्राउंड स्टाफला मदत केली. लखनऊच्या एकाना स्टेडियमवर ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंका यांच्यात खेळल्या जात असलेल्या सामन्यादरम्यान वॉर्नरने अशी कृती केली तुम्हीही त्याचे कौतुक कराल.

या सामन्यात श्रीलंकेच्या संघाने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. या सामन्यात पावसामुळे काही काळ खेळावर परिणाम झाला होता. पावसादरम्यान ऑस्ट्रेलियाचा फलंदाज डेव्हिड वॉर्नरने आपल्या स्टाईलने क्रिकेट चाहत्यांची मने जिंकली. ३३वे षटक सुरू होताच पावसाने सामन्यात व्यत्यय आणला, त्यानंतर खेळाडूंनी मैदान सोडले. स्टेडियममधील कर्मचारी खेळपट्टी झाकण्यासाठी धावले. हे पाहून ऑस्ट्रेलियन फलंदाज डेव्हिड वॉर्नरने मैदानावरील कर्मचाऱ्यांना खेळपट्टी झाकण्यात मदत केली आणि कव्हर्स खेळपट्टीवर नेल्या. हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असून त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. ऑस्ट्रेलियन संघाने श्रीलंकेचा डाव ४३.३ षटकांत २०९ धावांत गुंडाळला. लंकन संघाला चांगल्या सुरुवातीचा फायदा उठवता आला नाही. कुसल परेरा आणि पाथुम निसांका यांनी पहिल्या विकेटसाठी १२५ धावांची भागीदारी करून श्रीलंकेला दमदार सुरुवात करून दिली. निसांका ६१ धावा करून बाद झाली. त्याच्यानंतर कुसल मेंडिस ७८ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. हे दोघे बाद झाल्यानंतर लंकेचा संघ २०९ धावांवर गडगडला.